# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग, पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com


जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/उत्तरपत्रिका बहिष्कार/पुवि/२०१६/2988

दि :- 23 MAR 2017

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या

सर्व माध्यमिक सलग्न उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय,

सर्व वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे/अहमदनगर/सोलापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१७ परीक्षेच्या उत्तर पत्रिकेच्या तपासणी कामकाजावर बहिष्काराबाबत**

**संदर्भ :-विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ पुणे यांचे पत्र जा.क्र.पुविमं/शाखा-ब/उमा /२९२६ दि. १५.०३.२०१७**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा तपासणी कामकाजावर शिक्षकांनी बहिष्कार घातल्यामुळे सदरबाबत मंडळाकडे आपण मार्गदर्शन मागविलेले होते. मंडळाच्या संदर्भिय पत्रानुसार उत्तरपत्रिका तपासणीबाबत मंडळ नियमाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपणांस अवगत केलेले आहे.

**महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील अनुसूची-अ नियम क्र-२२(१) मधील शिक्षकांची कर्तव्य नियम १८--** शासनाने आयोजित केलेल्या कोणत्याही परीक्षेसाठी आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा विभागीय मंउळाकडून नियुक्त केला गेल्यास परीक्षाचालक किंवा परीक्षा उपचालक किंवा पर्यवेक्षक म्हणून काम पाहील, आणि शासनाने आणि मंडळांनी संबधित परीक्षांसाठी विहित केलेल्या नियमानुसार कार्यक्षमता आणि शिस्त-पालन यांसाठी तो जबाबादार राहील.

**महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील अनुसूची-अ नियम क्र-२२(१) मधील शिक्षकांची कर्तव्य नियम नियम १९--** शासनाने आयोजित केलेल्या कोणत्याही परीक्षेसाठी आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षांसाठी परीक्षक किंवा सहाय्यक परीक्षक किंवा नियामक किंवा प्रमुख नियामक क़िंवा प्राश्निक किंवा तज्ञ म्हणून करील आणि शासनाकडून आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा विभागीय मंडळ यांच्याकडून सोपवण्यात येईल असे अन्य काम करील, आणि याबाबत शासनाने किंवा मंडळाने त्यासंदर्भात विहित केलेल्या नियमानुसार कार्यक्षमता आणि शिस्तपालन यासाठी तो जबाबदार राहील, सदरचे नियम आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या निदर्शनास आणावेत, सदर नियमांचा भंग झाल्यास त्याची संपुर्ण शिक्षकांची वैयक्तिक राहील ही याची सूचना देण्यात यावी.

त्यानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१७ च्या उत्तर पत्रिका तपासणी कामकाजाचे नियोजन करावे व तात्काळ उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज सुरु राहील याबाबत दक्षता घ्यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक ,
पुणे विभाग,पुणे-१

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर/पुणे/सोलापूर** यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळांच्या प्राचार्य यांच्या निदर्शनास आणावी.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

**१) मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.**

**२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे-१.**

**प्रतः- विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ पुणे-०५.**